**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१**

**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**


पत्र क्र.नाविमं प.मा. / प.उ.मा. / 4179
नागपूर, दिनांक16 / 11 / 2022

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य.
सर्व मान्यताप्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये
नागपूर विभाग,
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

**विषय :– फेब्रुवारी / मार्च 2023 मध्ये घेण्यात येणा–या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणा–या विदयार्थ्यांचे हजेरी क्षमापित करणे, आवेदनपत्र रद्द करणेबाबत विदयार्थ्यांचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत.**

संदर्भ:– क्रमांक रा. मं./ परीक्षा ८/ पुणे ४११ ००४ दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२

1 **विभागीय मंडळाकडून उपस्थितीबाबत तूट क्षमापित करणेबाबत.**

नियमित विद्यार्थ्यांची प्रथम व द्वितीय सत्रातील हजेरी स्वतंत्रपणे 75 टक्के भरणे आवश्यक आहे. उपस्थितीची गणना **प्रथम सत्र कनिष्ठ महाविद्यालय सुरू झाल्यापासून 15 ऑक्टोबर पर्यंत व दुसरे सत्र 16 ऑक्टोबर पासून 31 जानेवारीपर्यंत धरण्यात यावी.** ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे सरासरी 60 टक्के ते 75 टक्केच्या दरम्यान आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्याचा अधिकार विभागीय अध्यक्षांना आहे.

2 **राज्य मंडळाकडून उपस्थितीतील तूट क्षमापित करणेबाबत.**

ज्या नियमित विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रथम व द्वितीय सत्रात स्वतंत्रपणे अथवा अपवादात्मक प्रकरणी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे **50 टक्के पेक्षा जास्त परंतू 60 टक्केपेक्षा कमी आहे** आणि त्रुटीचे कारण 1) विद्यार्थ्यांचा प्रलंबित आजार 2) विद्यार्थ्यांच्या आई वडिलांचे आकस्मिक निधन 3) अनपेक्षित कारणांमुळे विद्यार्थ्यांस ब–याच कालावधीसाठी परगावी/ परदेशी जाणे भाग पाडणे 4) नैसर्गिक आपत्ती 5) या खेरीज अन्य रास्त कारण असल्यास अशा कारणांच्या सबळ पुराव्यासह (दाखला, प्रमाणपत्र) सत्रवार हजेरीतील तफावतीची नोंद करून प्रस्ताव पाठवावेत. प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वतंत्र परिशिष्ट दयावे. प्रत्येक प्रकरणाची छाननी करून विभागीय अध्यक्षांच्या शिफारशीसह प्रस्ताव मा. अध्यक्ष, राज्य मंडळ, पुणे यांच्याकडे अंतिम निर्णयासाठी पाठविण्यात येतील. याबाबत राज्य मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

3 **आवेदनपत्र रद्द करणेबाबत.**

ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे 75 टक्के भरत नाही व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी 50 टक्के ते 75 टक्केच्या दरम्यानची आहे अशा विद्यार्थ्यांची हजेरी क्षमापित करण्यासाठी आपणास शिफारस करावयाची नाही आणि त्यामूळे आवेदनपत्र रदद करावयाचे आहे असे प्रस्ताव व ज्या विद्यार्थ्यांची हजेरी दोन्ही सत्रात स्वतंत्रपणे अगर एका सत्रात 50 टक्केपेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवेदनपत्र रदद करण्यासाठी विहित तक्त्यात एकत्रितरित्या आपल्या शिफारशीने 05 फेब्रुवारी 2023 पर्यंत या विभागीय मंडळास प्राप्त होतील या बेताने सादर करावेत. **हजेरी कमी या कारणाखेरीज अन्य कारणास्तव आवेदनपत्र रद्द केले जाणार नाहीत तसेच उपरोक्त बाबत फेर प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.** आवश्यकतेनुसार मंडळाकडुन मुळ अभिलेखाची मागणी करण्यात येईल त्यावेळी ते सादर करावेत. **तसेच दिनांक 05 फेब्रुवारी ,2023 नंतर सादर करण्यात येणा–या प्रस्तावाला विद्यार्थ्यांचे नैसर्गिक आपत्तीचे कारण वगळता इतर कारणासाठी प्रति विद्यार्थी प्रशासकीय शुल्क रू.500/– आकारण्यात येतील याची नोंद घ्यावी.**

(चितांमण वंजारी )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी:–1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.
2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.